॥ आनंदी, आनंद गडे ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः त्र्यं. ठोमरे
संगीतः पं. हृदयनाथ मंगेशकर

आनंदी-आनंद गडे
इकडे, तिकडे, चोहिंकडे
वरतीं खाली मोद भरे;
वायुसंगे मोद फिरे
नभांत भरला - दिशांत फिरला,
जगांत उरला
मोद विहरतो चोहिंकडे ॥ धृ. ॥

सूर्यकिरण सोनेरी हे
कौमुदि ही हंसते आहे;
खुलली संध्या प्रेमानें,
आनंदें गाते गाणें;
मेघ रंगले - चित्त दंगलें,
गान स्फुरलें,
इकडे, तिकडे चोहिंकडे ॥ १ ॥

वाहति निर्झर मंदगति,
डोलति लतिका वृक्षतती,
पक्षि मनोहर कूजित रे,
कोणाला गातात बरे?
कमल विकसलें - भ्रमर गुंतले,
डोलत वदले-
इकडे, तिकडे चोहिंकडे ॥ २ ॥

कौमुदिः चंद्रिका, चंद्रप्रकाश